# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 11-02-2022

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-02-11 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2022-02-12 | 2022-02-13 | 2022-02-14 | 2022-02-15 | 2022-02-16 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.9 |
| कमाल तापमान (अं.से) | 28.8 | 29.1 | 29.3 | 29.8 | 29.2 |
| किमान तापमान (अं.से) | 14.0 | 14.3 | 14.6 | 15.2 | 15.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 68 | 69 | 67 | 71 | 74 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 48 | 49 | 47 | 51 | 54 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 8.0 | 8.0 | 7.0 | 7.0 | 8.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 21 | 25 | 87 | 110 | 114 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 1 | 1 | 3 | 2 |

### हवामान सारांश / चेतावणी:

रामटेक तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक १२ फेब्रुवारी २०२२ ते १६ फेब्रुवारी २०२२ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची तसेच पुढील चार दिवस हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता व दिनांक १६ फेब्रुवारी २०२२ रोजी अति हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### कृषि सल्ला:

पुढील चार दिवस कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता रब्बी हंगामातील पिके, फळबागा व भाजीपाल पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे, कीड व रोग व्यवस्थापनासाठी लेबल क्लेम आधारित शिफारशीत असलेले कृषी रसायनांची फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकामध्ये अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी खते देण्याची कामे पुढील उरकून घ्यावी. पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील कोरडवाहू हरभरा व तूर पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार झालेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी तसेच बाजारायोग्य भाजीपाला व फळांची काढणी करावी.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

परिपक्व अवस्थेतील कोरडवाहू हरभरा व तूर पिकाची काढणी व मळणी करावी तसेच तयार झालेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी तसेच बाजारायोग्य भाजीपाला व फळांची काढणी करावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| गहू | गहू पिकास जमिनीतील ओलावा व पिकाची गरज लक्षात घेता पिक अवस्थेनुसार कांडी धरण्याची उशिरा अवस्था (पेरणीनंतर ४५-५० दिवस), फुलोरा अवस्था (पेरणीनंतर ६५-७० दिवस), फुलोरा अवस्था (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवस), दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस) मध्ये असताना सिंचन करावे. गहू पिकामध्ये तांबेरा आणि पानावरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास मॅनकोझेब ७५ % डब्ल्यूपी २० ते २५ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भेंडी | उन्हाळी भेंडी लागवडीसाठी १० ते १५ किलो/हेक्टर बियाणे व त्यासाठी लागवडीचे अंतर ४५x३० से.मी. व शिफारस केलेल्या जातींमध्ये प्रगती, अर्का अनामिका, पुसा मखमली, परभणी क्रांती आणि फुले विभक्त यांचा समावेश करावा. |
| हरभरा | घाटे अळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी उपाययोजना कराव्यात. शेतामध्ये प्रती हेक्टरी २० पक्षीथांबे लावावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस आठ ते दहा पतंग आढळल्यास व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात. पिकाचे निरीक्षण करून किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किंवा पिक ४० ते ५० % फुलोरा अवस्थेत असताना सर्वप्रथम वनस्पतीजन्य किंवा जैविक किटकनाशकांना प्राधान्य द्यावे. त्यासाठी पहिली फवारणी निंबोळी अर्क ५ % किंवा अझाडिरेकटीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून नापस्याक पंपाने फवारणी करावी. पावर स्प्रेयर ने फवारणी करायची असल्यास किटकनाशकाची मात्रा तीन पट करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के ईसी २० मिली किंवा इमामेक्तीन बेन्झोएट ५ % एसजी ३ ग्राम किंवा फ्ल्यूबेंडीअमाईड २० % डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा क्लोराँट्रानिलिप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यत मिसळून फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | ठिबक सिंचनाद्वारे १ ते ४, ५ ते ७ व ८ वर्षावरील झाडांना अनुक्रमे ९ ते ४०, ६० ते ९६ आणि १०८ ते १३७ लिटर प्रती दिवस पाणी द्यावे. ठिबक संच नसल्यास दुहेरी आळे पद्धतीने ७ ते १० दिवसाच्या अंतराने ओलीत करावे. या काळात सर्वसाधारणपणे लिंबूवर्गीय लीफ मायनर व सायला या किडी सक्रिय असतात. लिंबूवर्गीय सायला किडीच्या नियंत्रणासाठी अंबिया बहराच्या वेळी इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली, क्विनालफॉस २ मिली किंवा डायमेथोएट २ मिली प्रती एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. लीफ मायनर किडीच्या व्यवस्थापनासाठी थायामेथोक्सॅम ०.३ ग्रॅम किंवा फेनव्हॅलेरेट १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १० दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. लिंबूवर्गीय मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास क्विनालफॉस @ 2 मिली किंवा डायमेथोएट @ 2 मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. झाडाच्या खोडावर डिंकाचा स्त्राव निघत असलाय्स डिंकाचा भाग धारदार चाकूने काढून टाका आणि झाडाच्या खोडाच्या प्रभावित भागावर मेटालॅक्सिल पेस्ट किंवा फॉसेटील एएल ची पेस्ट लावावि. या काळात पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येतो. पाने खाणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी क्विनालफॉस २ मिली किंवा फेनव्हॅलेरेट २ मिली प्रती एक लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबिया बहाराच्या वेळी जिबरेलिक आम्ल १.५ ग्राम सोबत १ किलो युरिया १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी. (पाण्यात मिसळण्यापूर्वी 10 मिली अल्कोहोलमध्ये गिबेरेलिक ॲसिड विरघळवा) |
| अळशी | बोन्ड्या धरण्याच्या ते भरण्याच्या अवस्थेतील जवस पिकास हलके ओलीत करावे. |
| आंबा | आंब्याच्या मोहोरावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास तुडतुडे किडीच्या व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % प्रवाही १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % प्रवाही ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ५ टक्के प्रवाही ५ मिली किंवा मिथाईल डिमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आंबा वरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनाझोल ५ टक्के प्रवाही १० मिली किंवा पेनकानझोल १० टक्के प्रवाही ५ मिली किंवा सल्फर ८० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ३० ग्राम किंवा डिनकॅप ४८ टक्के प्रवाही ५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | उन्हाळी हंगामात टरबूज पिकाची लागवडी साठी शुगर बेबी, असाही यामाटो, अर्का ज्योती, अर्का माणिक या वाणाची निवड करावी. लागवडीवेळी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे व ४० किलो नत्र लागवडी नंतर ३० दिवसांनी द्यावे. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| खरबूज | उन्हाळी हंगामात खरबूज पिकाच्या लागवडीसाठी हरा मधु, पुसा शरबती, पंजाब सुनहरी, अर्का राजहंस, अर्का जीत, पुसा मधुरस या वाणाची लागवड करावी. लागवडीवेळी ४० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे व ४० किलो नत्र लागवडी नंतर ३० दिवसांनी द्यावे. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | शेळ्यांच्या करडा च्या अंगावर गोचीड पिसावांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास करडांना समप्रमाणात राख व ५० % कार्बारील पावडर मिसळून अंगावर चोळावी. जास्त प्रादुर्भाव असल्यास २ मिली ब्यूटोक्स किंवा अमित्राझ औषध टाकून शेळ्या व करडांना अंघोळ घालावी. कीटक नाशकाचा वापर अतिशय सावधपणे करावा व करडांना चाटून विषबाधा होणार नाही याची काळजी घ्यावी. शेळ्या व मेंढ्या यांना बुळकांडी रोगप्रतिकारक लसीकरण करावे. |
| गाय | जनावरांसाठी हिरव्या चाऱ्यासाठी मका पिकाच्या आफ्रिकन टॉल आणि ज्वारी पिकाच्या पुसा चारी, एसएसजी ८९८ या वाणाची लागवड करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | उन्हाळी हंगामात ओलिताची उपलब्धता आणि बाजाराची गरज लक्षात घेता पालेभाज्या, भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर यांची लागवड करावी. |
| सामान्य सल्ला | हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या मागील दिवसाच्या सकाळी ०८:३० वाजेपासून नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. |